बृहन्मुंबई महानगरपालिका

श्री. हरिलाल भगवती महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय, बोरीवली (प.), मुंबई – ४००१०३

एचओ /बीएच/ ३३८६ / एनटीसी दिनांक: 21.10.2026

**थेट मुलाखती द्वारे पदे भरण्यासाठी जाहिरात**

खालील तक्ता क्र. ०१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आवास अधिकारी या पदांसाठी (tenure post ) उमेदवारांना थेट मुलाखतीसाठी आमंत्रित करण्यात येत आहे.

इच्छुक उमेदवारांनी सध्याचा पासपोर्ट आकाराचा फोटो असलेला अर्ज, बायोडाटा तसेच शैक्षणिक पात्रता, अनुभव, प्रशस्तिपत्रे आणि सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेली इतर आवश्यक प्रमाणपत्रांच्या स्व-साक्षांकित प्रती सादर कराव्यात. नोंदणीची वेळ संपल्यानंतर येणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीस उपस्थित राहता येणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नियमित कर्मचारी मानले जाणार नाही आणि त्यांना नियमित कर्मचारी म्हणून सामावून घेण्याचा कोणताही अधिकार राहणार नाही.

**तक्ता क्र. – ०१**

| अ.क्र. | पदाचे नाव व पदांची संख्या | दरमहा एकत्रित वेतन (रु.) | शैक्षणिक पात्रता | नोंदणीचे ठिकाण , वेळ | मुलाखतीचे ठिकाण, दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | आवास अधिकारी ३ | मुळ - रु. ६६०० /- +डी. पी. रु. ३३०० /- + महागाई भत्ता (नियमांनुसार)+27000 SAC | आवश्यक<br>1) एमबीबीएस<br>2) एमएमसी कायमस्वरूपी नोंदणी<br><br>अपेक्षित<br>1. मराठी भाषेचे ज्ञान<br>2. अनुभवी उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल。 | प्रमुख वैद्यकीय अधिकारी (CMO) कार्यालय , पहिला माळा, खोली क्रं. २६ श्री. हरिलाल भगवती महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय, बोरीवली (प.), मुंबई – ४००१०३<br>दिनांक. ०२.११.२०२६<br>वेळ सकाळी १०.०० ते सकाळी १०.३० पर्यंत | प्रमुख वैद्यकीय अधिकारी (CMO) कार्यालय , पहिला माळा, खोली क्रं. २६ श्री. हरिलाल भगवती महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय, बोरीवली (प.), मुंबई – ४००१०३<br>दिनांक. ०२.११.२०२६<br>वेळ सकाळी ११.०० ते दुपार १२.३० पर्यंत |

अटी व शर्ती

१. सदर पदाचा कालावधी नियुक्ती दिनांकापासून ३१ जानेवारी २०२७ पर्यंत असेल.

2. उमेदवाराने अर्जात कोणतीही खोटी माहिती किंवा खोटे प्रमाणपत्र सादर केल्याचे, अथवा कोणतीही माहिती लपविल्याचे किंवा वगळल्याचे आढळल्यास, संबंधित पदासाठी त्याचा विचार केला जाणार नाही. नियुक्ती झालेली असल्यास, ती नियुक्ती रद्द करण्यात येऊ शकते.

3. काळ्या यादीत (Blacklisted) समाविष्ट असलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

4. ज्या उमेदवारांनी देऊ केलेली नियुक्ती नाकारली, नियुक्ती स्वीकारल्यानंतर रुजू झाले नाहीत किंवा नियुक्तीचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी सेवा सोडली, अशा उमेदवारांचा महानगरपालिकेच्या कोणत्याही वैद्यकीय संस्थेतील इतर पदांसाठी पुढील तीन वर्षांच्या कालावधीत विचार केला जाणार नाही.

5. रुग्णालयाच्या कामकाज व निकडीनुसार पदांची संख्या बदलू शकते

6 निवड झालेल्या उमेदवारांनी समुपदेशनासाठी (Counseling) वरील पत्त्यावरील प्रमुख वैद्यकीय अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत कळविल्याप्रमाणे मूळ शैक्षणिक प्रमाणपत्रांसह स्वत:च्या खर्चाने उपस्थित राहावे.

7. वैद्यकीय शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांची महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे (Maharashtra Medical Council) नोंदणी झालेली असणे आवश्यक आहे.

8. निवड झालेल्या उमेदवारांनी समुपदेशनाच्या वेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नावे रुपये १०,०००/- चा डिमांड ड्राफ्ट (DD) अथवा सदरची रक्कम चलन द्वारे अनामत रक्कम म्हणून जमा करणे आवश्यक आहे. अन्यथा नियुक्ती आदेश दिला जाणार नाही. नियुक्तीचा संपूर्ण कालावधी पूर्ण केल्यानंतरच अनामत रक्कम परत मिळण्यास उमेदवार पात्र ठरू शकतील.

९. निवड झालेल्या उमेदवारांना बायोमेट्रिक उपस्थिती अनिवार्य आहे.

10 प्रशासनाच्या आवश्यकतेनुसार या रुग्णालयातील कोणत्याही वॉर्डमध्ये नियुक्तीच्या संपूर्ण कालावधीत काम करणे उमेदवारांसाठी बंधनकारक राहील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

11. मुलाखतीस उपस्थित राहण्यासाठी कोणताही प्रवास भत्ता / दैनिक भत्ता (TA/DA) दिला जाणार नाही.

स्वाक्षरी/-
प्रमुख वैद्यकीय अधिकारी
श्री. हरिलाल भगवती महानगरपालिका रुग्णालय,
बोरीवली (प.)